# राशिभविष्य - डिसेंबर, २०१२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव प्राप्त होतीलसे दिसते. केवळ गुरु-शुक्र हे दोन शुभ ग्रह काही प्रमाणात अनुकुल होणार असल्याने या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सुसह्य होईल. महिन्याच्या पूर्वार्धात प्रवास आवश्यक व नाइलाज असेल तरच करा. कारण प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. वरिष्ठांशी मतभेद, वाद होणे संभवते. त्यामुळे स्वत:चे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. होत्याचे नव्हते होईल. जपा. पण हा मंगळ उच्च राशीत जात असल्याने यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषधी व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय असणारांना मात्र अनुकुल होईल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने सतत मनाविरुद्ध घटना घडतील व असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. यास्तव मन शांत ठेवा, सहनशील व्हा, नम्रतेचे आचरण करा म्हणजे प्रतिकुल काळाचा मनस्ताप सुसह्य होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या अष्टम स्थानी राहूयुक्त मंगळ असेल व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. या राशीच्या व्ययस्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्याने सदैव सावधानतेने आचरण होणे अगत्याचे आहे. कुसंगतीपासून जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मात्र मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. श्रद्धेने गणेशोपासना कराच.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ हे दोन्ही ग्रह अतिशय प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे स्वत:चे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. काहींना अपचन, पोटाचे विकार, तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना मूळव्याधीसारख्या उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. तसेच काहीना अकारण शारीरिक-मानसिक कष्ट होतीलसे दिसते. शिवाय पाणी व वीज यांपासून धोकाही संभवतो. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. अकारण मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक आर्थिक लाभ वा हानी होतीलसे दिसते. जपा. मानसोपचारतज्न्य, द्रव पदार्थ व्यापारी, लोखंड, कोळसा व्यापारी, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय वा संशोधनात्मक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इतर नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र अस्थिर परस्थितीला सामोरे जावे लागेल. तसेच दिनांक ९-१० हे दोन दिवस असह्य मनस्ताप देणारे ठरण्याची शक्यता दिसते. जपा. गुरु-हर्षलमधील लाभयोगामुळे या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीच्या जीवनात कसली तरी लाभदायक घटना घडणे संभवते. मात्र मित्रांशी भांडणे, वाद टाळा. वाहने जपून व सावधानतेने चालवा. अपघातभय आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल व लाभदायक होईल.

**(३) मिथुन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव लहरी वा विक्षिप्त होण्याची

शक्यता दिसते. त्यामुळे सतत मनावर नियंत्रण ठेवूनच आचरण करा. तेच सुखाचे होईल. अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेत प्रगती होण्यास काळ अनुकुल होईल. सूचक स्वप्ने पडतील. तसेच सामाजिक कार्यात कार्यरत असणारांनाही काळ प्रगतिकारक व सुखानंदसंतोष देणारा असल्याचा अनुभव येईल. मात्र शक्यतो प्रवास टाळा. कारण अडचणी, त्रास, अपेक्षाभंग आदि सहन करावा लगेलसे दिसते. तसेच कौटुंबिक जीवनात त्रास व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. चिकित्सक बौद्धिक वा शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना, वकिली व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व विविध प्रकारचे लाभ देणारा असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशवारीचे योग येतील. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणास आलेले नैराश्य किंवा जडत्व अशापैकी कारणांमुळे अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. जीवनसाथीचे अनारोग्य किंवा जीवनसाथीशी होणारे मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखसमाधानात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत काहीही कारणाने बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. सध्या यश मिळण्यास काळ अनुकुल नाही. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध सर्व प्रकारचे अनारोग्य होणारा असल्याचाच अनुभव येईल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात शनि-राहूमुळे अपेक्षित गृहसौख्य व मुलांपैकी कोणाच्या आजारपणामुळे अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता नाही स्थावर संपत्ती असेल तर त्यासंबंधी वाद होण्याची शक्यता दिसते.या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नोकरदार मंडळींना वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्रास होणे संभवते. प्रिय जनांपासून फ़ारकत झाल्यामुळे मन अस्वस्थ राहील. तसेच स्वत:च्या अनारोग्याची काळजीही घ्यावी लागेल. अपघातभय आहेच. जपा. कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. शुक्राच्या अनुकुलतेने अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषधविक्री असे व्यवसाय असणाऱ्या या राशीच्या मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात, भागीदारी व्यापार-व्यवसायात मतभेदांमुळे, गैरसमजामुळे वा संशयामुळे बाधा येणे संभवते. तसेच जलभय, विषभय आहेच. जपा. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना संशोधनात अपेक्षित प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या भग्यवान मंडळीना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशवारीचे योग संभवतात. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरुमुळे या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील वा संपन्न होतील. तसेच प्रवासयोगही येतील. विविध मार्गांनी धनलाभही होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व संततिसुख या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक वाद, मतभेद, वाढता खर्च, मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, मनस्ताप देणाऱ्या घटना, कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठांचा त्रास, घरातील कोणाचे दूर निघून जाणे अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होऊन मनावरील ताबा सुटून अपघात होणे संभवते. जपा. या

राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. या राशीच्या काही मंडळीना अपप्रचाराचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. हृदयविकार असणारांनी तर मन सतत शांत व स्वस्थ राखण्याचा अटोकाट प्रयत्न केला पाहिजे. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचे आजार बळावतील. जपा. वैद्यकीय व्यवसाय, औषधी शास्त्रासंबंधी व्यवसाय, उच्च चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षण क्षेत्र, अकौंटन्सी, वृत्तपत्रव्यवसाय  असे नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अधिक प्रगतिकारक व लाभदायक होईल. दांपत्यजीवनात मतभेद, कोणास आलेले नैराश्य, कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेलच याची खात्री देता येत नाही. सध्या मीन राशीतील हर्षल या राशीच्या अष्टम स्थानी असल्याने या राशीच्या मंडळीनी सतत सावधानतेने आचरण केले पाहिजे. कारण अपघातभय आहे. या राशीच्या मंडळीनी सध्या नवीन व्यापार-व्यवसाय करण्याचा विचारही करू नये. आहे ती नोकरीच व्यवस्थित करावी. मात्र शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईलसे दिसते.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालूच आहे, याची जाणीव ठेवूनच मन व विचार काबूत ठेवून योग्य असे आचरण सतत करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कुटुंबात मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. आर्थिक समस्या त्रस्त करतील. पण डगमगून न जाता खंबीर मन व विचारशक्तीच्या जोरावर या प्रतिकुल काळावर मात करू शकाल. रवि-राहू अनुकुल असल्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकाल. वरिष्ठ अधिकारी खूष होतील. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र रवि-मंगळ-बुध हे तिन्ही ग्रह प्रतिकुल होणार असल्याने कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात काहीही कारणाने बाधा येणे संभवते, जपा. राहत्या जागेची समस्या, स्थावर समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात

मुलांपैकी कोणाच्या अयोग्य आचरणामुळे किंवा आरोग्यविषयक समस्येमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या काही मंडळीना उगीचच आपल्याला काही तरी आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काल्पनिक चिंतेनेच त्यांना अकारण मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी व्यवसायात गैरसमजाची किंवा संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. जीवनसाथीच्या लहरी व विक्षिप्त आचरणामुळे वाद, मतभेद होणे संभवते. जपा. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे अपेक्षित प्रगती साधणे शक्य होईल. दररोज हनुमानचालीसा श्रद्धेने वाचाच.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना शनि ग्रहाची साडेसाती चालू आहेच. पण राशिस्थानी उच्च राशीचा शनि असल्यामुळे असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता वाटत नाही. केवळ सकारण वा अकारण मन अस्वस्थ राहील व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. असे असले तरी महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळीना आर्थिक समस्या त्रस्त करतील; तर काहीना आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागेलसे दिसते. काही मंडळीना डोळ्याची दुखणी त्रस्त करतील. पण बुध-शुक्रामुळे मधून मधून अर्थलाभ होणेही शक्य दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. शासकीय, निम-शासकीय कार्यक्षेत्र असणारांची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यास काळ अनुकुल

होईल. कर्तृत्व सिद्ध झाल्यामुळे काही मंडळीना मानाचे स्थान तर काहीना उच्च पद मिळू शकेल. पण विविध कारणांनी कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य मिळेलच याची खात्री वाटत नाही. मन अत्यंत भावनाशील झाले असल्यामुळे थोडेही काही मनाविरुद्ध घडले तरी लगेच मनाला असह्य वेदना होतील. अशा परिस्थितीत अध्यात्माची ओढ, आवड असेल तर इष्ट देवतेच्या उपासनेद्वारे किंवा शिवोपासनेद्वारे मन शांत ठेवणे शक्य होईल. उच्च बौद्धिक संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ प्रगतिकारक होईल; पण अति विचार करू नका. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास होईल. काहींना तर मेंदूविकार होणेही संभवते. जपा. काही मंडळीना मुदतीच्या तापाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या केतूमुळे काही मंडळीना त्वचा रोग, काहीना मुख-दंतविकार तर काहीना रक्तविकाराचा आजार होणे संभवते. जपा. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ वा वारसा धन मिळू शकेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना शनि ग्रहची साडेसाती सुरू होऊन केवळ एकच वर्ष झाले आहे. राशिस्वामी मंगळ असल्यामुळे व तो शनि ग्रहाचा शत्रु असल्यामुळे विविध कारणांनी चिंता, मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच प्रतिकुल काळाचा सर्व प्रकारच्या आरोग्यावरही परिणाम होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर अति विचार न करता मन अगदी शांत राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उष्णताविकार बळावून घसा दुखणे, मान दुखणे, दाढ दुखणे, डोळ्यात खुपऱ्या वाढणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. येणे वसूल होणार नाही; पण देणे मात्र द्यावेच लागेल. जपा. सामान्य नोकरदार मंडळींना तर खर्चाची मिळवणी करण्यासाठी अधिक कष्ट करावे लागतील. महिन्याच्या उत्तरार्धात शनि-मंगळ कुयोग होत असल्याने शारीरिक इजा होणे, अपघात होणे संभवते. जपा. दिनांक ११-१२ हे दोन दिवस विशेष जपून सर्व आर्थिक व्यवहार व आचरण करावे. काही मंडळींच्या मागे कोर्टलचांड लागण्याची शक्यता दिसते. जपा. उच्च बौद्धिक संशोधन क्षेत्र, साहित्यनिर्मिती, कलाक्षेत्र अशा प्रकारचे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मतभेद, गैरसमज अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो; तर काही मंडळीना नैराश्यामुळे वैराग्य घ्यावेसे वाटेल. श्रद्धा असेल तर गणेशोपासना अनुकुल होईल व त्यामुळे मन शांत व खंबीर होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेलसे दिसते. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरु-केतूमुळे अनारोग्यविषयक परिस्थिती हद्दीबाहेर जाणार नाही. केवळ उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. तसेच वर्तमान हट्टी स्वभावामुळे अकारण शारीरिक कष्ट, दगदग होऊन थकावट जाणवेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर मनक्षोभावर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवले पाहिजे. तरच मधून मधून घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचे सुखसमाधान लाभेल. सर्व प्रकारच्या चिकित्सक बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना, शिक्षणक्षेत्र, पत्रकारिता, वकिली-सल्लागारी क्षेत्र अशी बौद्धिक कार्यक्षेत्रे असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व समाधानकारक जाईल. आर्थिक लाभ होतील. वर्तमान हट्टी, अहंकारी स्वभावावर नियंत्रण ठेवलेत व आहे त्या वर्तमान परिस्थितीत तक्रार न करता सुखाने कालक्रमणा केलीत तरच गृहसौख्य लाभू शकेल. या राशीच्या ज्या मंडळीना मनापासून अध्यात्माची ओढ

आहे, त्यांचे मन मात्र अत्यंत भावनाशील, हलकेफुलके असे झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपासनेद्वारे त्यांना आध्यात्मिक उन्नती साधणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचा योग येणे शक्य आहे. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या आदि कारणामुळे अपेक्षित संततिसुख मिळेलच याची खात्री देता येत नाही. श्रीदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अधिक अनुकुल असणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. पण वाममार्ग धन सहज मिळणार असले तरी तो मोह टाळावाच. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारे, लोखंडी सामानाचे व्यापारी, खनिज उद्योग असणारे अशा सर्वांना सुद्धा महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. बुध, शुक्र व गुरुच्या अनुकुलतेने कला व बौद्धिक क्षेत्रात कार्यरत असणारांना कठोर प्रयत्न केल्यास महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल प्रगतिकारक व लाभदायक होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल असला तरी काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात विविध कारणांनी अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यताही जाणवते. या राशीच्या काही मंडळीना पोटाच्या अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. दिनांक ९-१० आणि दिनांक १५-१६ हे चार दिवस अधिक तापदायक होणे शक्य आहे. महिन्याच्या उत्तरार्धात सतत मनाविरुद्ध घटना घडत असल्याचा अनुभव येईल. जुनी दबलेली काही प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लगेल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास होईल. जपा. विविध कारणांनी अपेक्षित संततिसुखातही बाधा येणे संभवते. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. आर्थिक घोटाळे होण्याची दाट शक्यता आहे. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या ज्या मंडळींचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी श्रीविष्णूची उपासना करावी.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय हळवे झाले असून स्वभाव मात्र अतिशय अस्थिर, चंचल व लहरी झाला असण्याची दाट शक्यता जाणवते. त्यामुळे कळत न कळत विचित्र व अविचाराचे आचरण होत असावे, असे वाटते. मनावर संयम राहात नसल्यामुळे बोलणेही फ़टकळ व धारदार होत असले पाहिजे. त्यामुळेच इतरेजन दुखावले जाऊन दुरावले जात असले पाहिजेत. असे घडत असेल तर मन व बुद्धीला लगाम लावणे तुमच्याच हाती आहे. मन व बुद्धी अशी ताब्यात राखू शकलात तर खूपच सुखाचे होईल. अविचाराने अनावश्यक खर्च होणार नाही याची काळजी घ्या. नपेक्षा आधीच हळव्या झालेल्या मनाला गहरे नैराश्य येईल. जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल; पण मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवूनच विवेक बुद्धीने आचरण झाले पाहिजे. या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळीना अधिकारपद किंवा मानाचे स्थान प्राप्त होईल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र कष्ट व परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ होण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या राशीच्या व्ययस्थानी जाईल तेव्हा तर मनाविरुद्ध अनेक घटना घडण्याची शक्यता जाणवते.
दांपत्यजीवनात मतभेद, वाद होणे संभवते. मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. त्यावेळी मन व

बुद्धीवर ताबा राहिला नाही तर अनर्थ होईल. जपा. सहनशीलता अंगी बाणल्यास बुध-गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने गृहसौख्य मिळू शकेल; पण नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील; तर काहीना मूल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत लहरी, चंचल व अस्थिर असा झाला असण्याची शक्यता जाणवते. कोणीही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तरी ते अपमानास्पद वाटत असावे. या राशीची लहान मुले तर सध्या अत्यंत हूड व व्रात्य झाली असल्याचा अनुभव पालकांना येत असला पाहिजे. पण मन मात्र सतत कसली ना कसली चिंता करणारे, कसल्या तरी विचारात व्यग्र असणारे व नैराश्यपूर्ण झाले असण्याची शक्यता जाणवते. कारण बंधुवर्गाकडून मनस्ताप दिला जात असावा, असे वाटते. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या मंडळीना कौटुंबिक व गृहसौख्याचे दृष्टीने प्रतिकुल अनुभव देणारा असाच सिद्ध होईल. पण बुध-शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती सुसह्य अशीच असेल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. मात्र वरिष्ठांशी नमते घेणेच सुखाचे होईल. मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखीने इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. काहीना अर्थलाभ तर काहीना प्रतिष्ठा प्राप्त होईल. पण या राशीच्या सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र कठोर कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न करावा लागेल. या राशीच्या साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. गुप्त पोलीस खात्यातील मंडळीना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या युवकांना काही तरी नवीन सुरू करण्याची ऊर्मी येणे संभवते. पण त्यांनी सध्या आहे तोच नोकरी-व्यवसाय सांभाळावा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर या राशीच्या काही भाग्यवंताना मूल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता दिसते. पण मित्रांशी भांडणे होऊन मैत्रीत बाधा येणेही शक्य आहे. जपा. श्रद्धेने बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====००००००=====